जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ४२८ दिनांक - १०/०६/२०२३**

अंमली पदार्थ विरोधी पथक १ गुन्हे शाखा पुणे शहर

## १३,७८,९५०/- रु किं.चे ४१७ ग्रॅम ४५० मिलीग्रॅम अफिम हा अंमली पदार्थ व इतर ऐवज जप्त करुन एका इसमांस केले जेरबंद

अंमली पदार्थ विरोधी पथक ०१ कडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.विनायक गायकवाड, सहा पोलीस निरीक्षक,लक्ष्मण ढेंगळे,व स्टाफ असे दिनांक ०९/०६/२०२३ रोजी पुणे शहरातील भारती विदयापीठ पोलीस स्टेशन कार्यक्षेत्रात पेट्रोलिंग करीत असताना पेट्रोलिंग दरम्यान पुणे आंबेगाव पठार येथील स्वामीनगर,तापकिर एस.टी.डी. जवळील सार्वजनिक रोडवर सार्वजनिक ठिकाणी येथे एक इसम अफिम हा अंमली पदार्थाची विक्री करीत असले बाबतची माहिती पोलीस अंमलदार पांडुरंग पवार व सचिन माळवे यांनी प्राप्त झाल्याने त्यांनी सदर बाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनायक गायकवाड यांना कळविले असता,

त्यांनी त्याबाबत कायदेशिर कारवाई करणे बाबत अधिनस्त स्टाफला दिलेले आदेशा नुसार सहा पो निरी लक्ष्मण ढेंगळे व स्टाफने सदर ठिकाणी जावुन छापा कारवाई करुन इसम नामे इसम नामे जितेंद्र देवीलाल शर्मा,वय ३८ वर्षे,रा.मु.पो.चाबा ता.शेरगड,जि.जोधपुर राज्य.राजस्थान सध्या रा.गुरुदत्त कॉलनी,प्रेरणा शाळे जवळ,आंबेगाव पठार,पुणे.यांस ताब्यात घेवुन त्यांची झडती घेतली असता त्याचे जवळ किं.रु.१३,७८,९५०/-रु.चा,ऐवज त्यामध्ये ४१७ ग्रॅम ४५० मिलीग्रॅम आफिम हा अंमली पदार्थ किं.रु.८,३४,९००/-रु.चा,तसेच १०,०००/- रु किं.चा एक सॅमसंग कंपनीचा मोबाईल, ३०,०००/- रु किं.ची एक होंडा ॲक्टीवा गाडी ,रोख रक्कम ३०५०/- रुपये,एक इलेक्ट्रॉनिक वजन काटा रु १,०००/- किं.रु.चा, एक मारुती सुझुकी एरटीका गाडी कि.रु.५,००,०००/- चा ऐवज अनाधिकाराने,बेकायदेशिररित्या विक्री करीता जवळ बाळगताना मिळुन आला.म्हणुन त्याचे विरुध्द भारती विदयापीठ पो.स्टे.येथे एन.डी.पी.एस.ॲक्ट कलम ८(क),१७(ब), प्रमाणे गु.र.नं.३५९/२०२३ गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वरील नमुद कारवाई ही मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त, श्री.संदिप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,श्री.रामनाथ पोकळे मा.पोलीस उप आयुक्त,गुन्हे, श्री.अमोल झेंडे मा.सहा पो आयुक्त,गुन्हे १,श्री.सुनिल पवार, यांचे मार्गदर्शना खाली कडील मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक अंमली पदार्थ विरोधी पथक,१ गुन्हे शाखा पुणे शहर श्री.विनायक गायकवाड,सहा पोलीस निरीक्षक लक्ष्मण ढेंगळे,पोलीस अंमलदार मारुती पारधी,प्रविण उत्तेकर,विशाल दळवी,पांडुरंग पवार,संदिप शिर्के,सचिन माळवे,संदेश काकडे,नितेश जाधव,रेहाना शेख,योगेश मोहिते यांनी केली आहे.